(९७)

महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
उत्सव इमारत,शिवनेरी पथ,बिबवेवाडी,पुणे-३७
Email - asakpal@punecorporation.org
दुरध्वनी क्र. - 020-25508700
जा.क्र. ८८४२ दि.- १८.०३.२०१९

## अपिलाची सुनावणी

अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांच्या प्राधिकरणासमोरील कामकाज.

**दिनांक - १८/०३/२०१९** **दिनांक - दुपारी ०३.३० वा.**

**स्थळ** - महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका, उत्सव इमारत, शिवनेरी पथ, बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७.

प्रति,

**श्री. अमित रतीलाल कदम**
६०/०२अ, पर्वती दर्शन,
पुणे ४११००९. } **अपिलार्थी**

**श्री. मु.म.शेख**
महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका. } **जनमाहिती अधिकारी तथा** उप अभियंता

### माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल

श्री. अमित रतीलाल कदम (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांचा माहिती अधिकारातील दिनांक १२/१२/२०१८ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता , महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका (यापुढे जन माहिती अधिकारी म्हणून संबोधिले जातील) यांना दिनांक १२/१२/२०१८ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जाव्दारे अपिलार्थी यांनी सन २०१६ ते २०१८ पर्यंत सॅलिसबरी पार्क परिसरातील फुटपाथच्या कामांबाबतची माहिती विचारलेली होती.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| **अर्जाचा दिनांक** | **अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक** | **माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक** | **अर्जदारास माहिती पाठविल्याचा दिनांक** | **विलंब दिवस** |
| १२/१२/२०१८ | १२/१२/२०१८ | ११/०१/२०१९ | २१/१२/२०१८ | - |

अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती समाधानकारित्या न मिळाल्याने त्यांचा अपिल अर्ज दिनांक१६/०१/२०१९ रोजी अपिल अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे प्राप्त झाला.

| अपिल अर्जाचा तपशील | | |
|---|---|---|
| **अपिल अर्जाचा दिनांक** | **अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक** | **अपिल दाखल करावयाचा अंतिम दिनांक** |
| १६/०१/२०१९ | १६/०१/२०१९ | अपिल अर्ज मुदतीत आहे. |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ - दि.१३/०२/२०१९ रोजी दुपारी ०३.३० वा.
प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ - दि.२५/०२/२०१९ रोजी दुपारी ०३.३० वा.
प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ - दि.१८/०३/२०१९ रोजी दुपारी ०३.३० वा.
सुनावणीस अपिलकर्ता - उपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी - उपस्थित
सुनावणीस सहा.जनमाहिती अधिकारी - उपस्थित

**जनमाहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील -**

| क्र. | माहितीचे वर्णन | तपशील |
|---|---|---|
| मुद्दा क्र.१ | सलिसबरी पार्क येथिल परिसरात सन २०१६ ते २०१८ अखेर फुटपाथ दुरूस्ती कॉंक्रीटीकरण व नविन फुटपाथ करणे याबाबत आपल्या विभागाकडून व विक्रेंद्रीकरणातून जे टेंडर लावण्यात आली त्या टेंडर सेटची संपूर्ण झेरॉक्स प्रत मिळावी. | सन २०१६ ते २०१८ अखेर फुटपाथ दुरूस्ती, कॉंक्रीटीकरण व नविन फुटपाथ करणे या बाबतची भांडवली व विकेंद्रीत विकास कामांची टेंडर सेटची छायांकित प्रत व सदर कामांशी संबंधीत ठेकेदार, मोजमाप पुस्तकातील नोंदी, काम पुर्ण केलेचे रंगीत फोटो इ. कागदपत्रांची माहितीची मागणी केलेली आहे. |
| मुद्दा क्र.२ | वरील टेंडर ज्या एजन्सीला देण्यात आले त्याची यादी मिळावी. | |

| | | |
|---|---|---|
| मुद्दा क्र.३ | वरील टेंडर पुर्ण झाल्यानंतर बील अदा केल्यानंतर ज्या मोजमाप पुस्तकात नोंद केली आहे व कलर फोटो काढलेली कलर झेरॉक्स संपूर्ण प्रकरणाची मिळावी. | त्यानुसार महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालयाकडे उपलब्ध असणाऱ्या कागदपत्रांची पुर्वनियोजित वेळेनुसार (श्री.हनुमान खलाटे, शाखा अभियंता मो.नं.९६८९९३१८८४ यांचेशी संपर्क साधून) कार्यालयात उपस्थित राहून आपणांस आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पाहणी केल्यानंतर त्याकरिताचे योग्य ते शुल्क भरल्यानंतर आपणांस उपलब्ध करून देणेत येतील. |
| मुद्दा क्र.४ | वरील सर्व माहितीचे अभिलेख मिळण्यासाठी जे काहि रकमेचे चलन भरण्यास मी तयार आहे. | |

अपिलार्थी यांचे वरील अपिल अर्जावर दिनांक १३/०२/२०१९ रोजी दुपारी ०३.३० वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी श्री.अमित रतीलाल कदम यांनी सुनावणीस उपस्थित राहणार नसल्याचे या कार्यालयास कळविले. तदनंतर सदर अपिल अर्जावर दिनांक २५/०२/२०१९ रोजी दुपारी ०३.३० वाजता पुन:श्च सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी श्री.अमित रतीलाल कदम हे वैद्यकिय कारणामुळे पुन:श्च आयोजित करणेत आलेलया सुनावणीस उपस्थित राहणार नसल्याबाबत व सुनावणी एकतर्फी व गुणवत्तेवर न होणेबाबत व त्यांना म्हणणे मांडण्याची संधी मिळणेकरिता सुनावणी दिनांक कळविण्याबाबत कळविल्याने, अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी मिळावी म्हणून दिनांक १८/०३/२०१९ रोजी दुपारी ०३.३० वाजता पुन:श्च सुनावणी आयोजित करणेत आलेली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी श्री.अमित रतीलाल कदम हे उपस्थित होते.

सदर दिनांकास श्री.मु.म.शेख जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते. सहाय्यक जनमाहिती अधिकार तथा कनिष्ठ अभियंता श्री.हनुमान खलाटे हे उपस्थित होते.

अपिलार्थी श्री. अमित रतीलाल कदम यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वयेच्या त्यांच्या अर्जाची माहिती समाधानकाररित्या न मिळाल्याने त्यांनी प्रथम अपिल अर्ज दाखल केलेला आहे.

वरीलप्रमाणे सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहितीचे अवलोकन करणेकरिता उपस्थित रहाणेबाबत कळविले असून, अपिलार्थी श्री.अमित रतीलाल कदम हे त्यांच्या माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या अर्जात नमूद माहितीच्या पाहणीकरिता कार्यालयात उपस्थित राहिले नसल्याचे सांगितले त्यानुसार जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले. त्यानुसार मी, अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे

**अपिल अधिकारी यांनी सदर सुनावणीमध्ये केलेले 'आदेश'**

- जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थींच्या माहिती अधिकार अर्जात नमूद केलेली माहिती पुढिल ०५ दिवसात अपिलार्थी श्री. अमित रतीलाल कदम यांना विनामुल्य उपलब्ध करून देणेत यावी. तसेच यापुढे माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त अर्जांची परिपूर्ण स्वरूपातील माहिती जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारास विहित मुदतीत उपलब्ध करून देणेची दक्षता घ्यावी.

कळावे,

18.03.19

(अविनाश सकपाळ)
**अपिलीय अधिकारी** तथा
**महापालिका सहाय्यक आयुक्त**
बिबवेवाडी कार्यालय
पुणे महानगरपालिका.

**टिप –**

१. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या आत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे – ४११००१ यांचेकड व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे.
२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत –

१. श्री.अमित रतीलाल कदम, रा.–६०/२ अ, पर्वती दर्शन, पुणे ४११००९.
२. श्री.मु.म.शेख, जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.
३. श्री. हनुमान खलाटे सहा.जनमाहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.